| **Publication** – Saimat | **Page No** - 01 |
|---|---|

# सर्वात मोठ्या रबर प्रदर्शनाचे आयोजन मुंबईत जानेवारी 2019मध्ये होणार

## इंडिया रबर एक्सपो, मुंबई 2019मध्ये एकाच ठिकाणी अंदाजे 300 प्रदर्शक आढळतील

**प्रतिनिधी । नाशिक**

इंडिया रबर एक्सपो(आयआरइ) हा आशियाचा सर्वात मोठा रबर एक्सपो आहे, 2001मध्ये त्याचा आरंभ झाला होता तेव्हा पासून तो आज रबर उद्योगातील सर्वात जास्त अपेक्षित कार्यक्रमांपैकी एक आहे. आता 10वे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि परिषद मुंबईमधल्या बाँबे एक्झिबिशन सेंटरमध्ये आयोजित केली जाणार असून ते विकास, आदानप्रदान आणि सहयोगासाठी उत्तम मंच ठरणार आहे. या आघाडीच्या कार्यक्रमाचे आयोजन ऑल इंडिया रबर इंडस्ट्रिज असोसिएशन या 1945 मध्ये स्थापना झालेल्या देशातील सर्वात जुन्या प्रिमियर इंडस्ट्रिज असोसिएशनमार्फत होणार आहे. ऑल इंडिया रबर इंडस्ट्रिज असोसिएशनची स्थापना भारतीय रबर उद्योगाचे संरक्षण करणे आणि त्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने झाली होती, आज ही संस्था 1200+ सक्रिय सभासदांसोबत विस्तीर्ण संबंधासोबत उद्योगाचा आवाज बनली आहे.

इंडिया रबर एक्सपो 2019 आंतरराष्ट्रीय मानकांना पूर्ण करण्याकडे, जगभरातील औद्योगिक व्यावसायिकांचे इंडिया रबर एक्सपो, मुंबई येथे स्वागत करण्यासाठी सज्ज आहे. भारतीय कंपन्यांना आंतरराष्ट्रीय कंपन्यांची भेट घेण्यासाठी आणि त्यांच्यासोबत सहयोग करण्यासाठी आगळावेगळा मंच मिळत आहे. विकसित होणाऱ्या रबर उद्योगाचा अंगभूत भाग म्हणून आयआरइ रबर उद्योगातल्या भारताच्या दुसयऱ्या सर्वात जलद गतीने प्रगती करणाऱ्या अर्थकारणाचे स्पष्ट निदर्शक आहे. आयआरइ रबर उद्योगातल्या अत्याधुनिक तांत्रिक प्रगतींचे प्रदर्शन करेल आणि आरॲण्डडी व दर्जा नियंत्रणाच्या बाजारपेठेतील सद्य स्थिती, सुविधा आणि सेवांबद्दल माहिती देणार आहे. रबर उद्योगासंबंधीच्या शासनाच्या बदलत्या नियमांबद्दल आणि नियंत्रणाबद्दल सूचना मिळत राहण्याची ही एक चांगली संधी असेल.

आयआरइ भारतातील 15 शहरांमध्ये इंडिया रबर एक्सपो 2019ला प्रोत्साहन देण्यासाठी रोड शोचे आयोजन करत आहे. हा रोड शो अहमदाबादपासून सुरु होऊन देशातील 15 शहरांमध्ये फिरुन जागरुकता निर्माण करणार आहे आणि इंडिया रबर एक्सपो 2019 मध्ये अधिकाधिक लोकांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देणार आहे. हा रोड शो एका मंचावर औद्योगिक व्यावसायिकांना एकत्र आणण्याचा एक उत्तम मार्ग आहे जिथे ते नवनवीन समाधानांसह येऊन नवीन व्यवसाय संधी शोधू शकतील आणि बदलत्या बाजारपेठ ट्रेंड्सबद्दल बोलू शकतील.

आयआरइ 2019 चे अध्यक्ष आणि ओरिएंटल रबर इंडस्ट्रिज प्रा.लि. चे अध्यक्ष आणि एम डी श्री विक्रम मकार यांनी सर्वप्रथम आयआरइची प्रगती आणि विस्तारण पाहिला होता. ते म्हणाले, "इंडिया रबर एक्सपो 2019 मध्ये उद्योगातील नामवंत संस्था एकाच ठिकाणी संम्मिलित होणार आहेत. यामुळे लहान आणि मोठ्या रबर व्यवसायिकांना नेटवर्क तयार करण्याची आणि संकल्पनांची देवाणघेवाण करण्याची संधी मिळणार आहे. तयार बाजारपेठ आणि अतिरिक्त गुणविशेषांसोबत भारतात या क्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक ते सर्व आहे मग ती तयार बाजारपेठ असो, संस्थात्मक संरचना आणि अगदी विस्तीर्ण भौतिक संसाधने असोत.

**इंडियन रबर एक्सपोबद्दल**

इंडिया रबर एक्सपो हा आशियाचा सर्वात मोठा रबर एक्सपो आहे. 2001मध्ये त्याचा आरंभ झाला होता तेव्हा पासून तो आज भारतातील रबर उद्योगाला अपूर्व संधी मिळवून देणाऱ्या कार्यक्रमांपैकी एक आहे. आता 10वे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि परिषद मुंबईमधल्या बाँबे एक्झिबिशन सेंटरमध्ये आयोजित केली जाणार असून तो विकास, आदानप्रदान आणि सहयोगासाठी उत्तम मंच ठरणार आहे. आयआरइ भारतीय कंपन्यांना परदेशी कंपन्यांसोबत भेट घेण्याची आणि सहयोग करण्याची आगळीवेगळी संधी देत आहे. विकसीत होणाऱ्या रबर उद्योगाचा अंगभूत भाग म्हणून आयआरइ रबर उद्योगातल्या भारताच्या दुसऱ्या सर्वात जलद गतीने भरभराट होणाऱ्या अर्थकारणाचे स्पष्ट निदर्शक आहे. आपल्या स्थापनेपासुन एक दशकाहून जास्त काळ प्रगती करणारा इंडिया रबर एक्सपो 2001मधल्या केवळ 3000 चौरस मीटरवरुन 2019मध्ये 26000 चौरस मीटर एवढ्या भव्यतेपर्यंत वाढला आहे.